# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर | वर्ष ५ वे | अंक ७४ | मंगळवार दि.२३ सप्टेंबर २०२५ | पृष्ठे ४ | स्वागत मूल्य २ रू.







## तावरजा नदीला पुन्हा पूर; शेतीसह शिऊर गावच्या पाणीपुरवठा योजनेचे मोठे नुकसान

### माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांनी शेतकऱ्यांना शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करण्याची दिली ग्वाही

लातूर / प्रतिनीधी : – काल रात्री अचानकपणे झालेल्या जोरदार पावसामुळे लातूर तालुक्यातील तावरजा नदीला पुन्हा पूर आला आहे. धरणाचे २२ दरवाजे उघडल्याने नदीचे पाणी शिऊर आणि इतर गावांच्या शिवारात घुसून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काढणीला आलेले सोयाबीन आणि इतर पिकांची पूर्णपणे नासाडी झाली आहे, तर शिऊर गावच्या पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईन वाहून गेल्याने गावचा पाणीपुरवठा खंडित झाला आहे. या गंभीर परिस्थितीची माहिती स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तसेच लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांना दिली. मागील महिन्याभरापासून लातूर जिल्ह्यात ढगफुटीसारखे प्रकार सातत्याने घडत आहेत. यामुळे जिल्ह्यातील नदीकाठची जमीन खरडून गेली असून, सखल भागात पाणी साचल्याने खरीप आणि बागायती पिके पूर्णतः वाया गेली आहेत. या गंभीर परिस्थितीची दखल घेत आमदार अमित देशमुख यांनी जिल्हा प्रशासनाने या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शासनाकडे अहवाल पाठवावा, अशी मागणी केली आहे. तसेच, आपद्ग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून भरीव मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न आणि पाठपुरावा करण्याची ग्वाही त्यांनी दिली आहे.

## ठाणेकरांना वाहतूक कोंडीतून दिलासा; मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत पार पडलं मेट्रो ट्रायल रन



ठाणे शहरात प्रवाशांच्या सेवेत पहिली मेट्रोसेवा लवकरचं धावणार आहे. आज सकाळी गायमुख येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मेट्रो ट्रायल रनचे उद्घाटन पार पडले. मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत नवरात्रीच्या पहिल्या दिवशी ही ट्रायल रन पार पडले. ठाणेकरांना सार्वजनिक वाहतुकीचा नवा पर्याय उपलब्ध व्हावा यासाठी मेट्रो मार्गिकेची उभारणी करण्यात आली आहे. यापैकी घोडबंदर मार्गावरील चार मेट्रो स्थानकांची आज, सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत एमएमआरडीए तांत्रिक तपासणी आणि ट्रायल रन झाला आहे. दरम्यान, हा मेट्रो मार्ग चार (वडाळा–घाटकोपर–कासारवडवली) मधील तपासणी टप्पा–१ मधील चार प्राधान्य स्थानके असून यात घोडबंदर रोडवरील, गायमुख जंक्शन, गायमुख गाव कासारवडवली, विजय गार्डन या चार स्थानकांचं समावेश आहे. सध्या ठाणे मेट्रो प्रकल्प ४ (वडाळा–घाटकोपर) आणि ४ – अ (कासारवडवली ते गायमुख) या प्रकल्पाची कामं सुरू आहेत. आजची चाचणी घोडबंदर येथील गायमुख ते पूर्व द्रुतगती मार्गावरील कॅडबरी जंक्शनपर्यंत झाली आहे. कोणत्या स्थानकांचा असणार समावेश? ठाणे मेट्रो ४ ही ३२ किलोमीटर तर ४ अ ही २.७ किलोमीटर मार्गावर धावेल. दोन्ही मार्गिका मिळून ३२ स्टेशन असतील. यामध्ये कॅडबरी, माजीवडा, कापूरबावडी, मानपाडा, टिकूजी–नी–वाडी, डोंगरी पाडा, विजय गार्डन, कासारवडवली, गोवानिवाडा आणि गायमुखया स्थानकांचा समावेश आहे. दरम्यान, ठाणेकरांच्या वाहतुकीसाठी हा टप्पा महत्वाचा मानला जातो. मेट्रो सुरू झाल्यानंतर शहरातील वाहतूककोंडीला मोठा दिलासा मिळणार असून प्रवाशांचा वेळही वाचणार आहे.

## विविध क्षेत्रातील कर्तुत्वान मान्यवरांचा रेणापूर येथे सन्मान सोहळा कोणत्याही क्षेत्रात प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम केल्यास निश्चित यश मिळते-आ. कराड

लातूर :– – चांगल्या कामाची, सेवाभावी वृत्तीची किंवा समाजसुधारणेच्या प्रयत्नांची समाजामध्ये दखल घेऊन त्यांचा सन्मान देऊन केला जातो. क्षेत्र कोणतेही असो, निवडलेल्या क्षेत्रात प्रामाणिकपणे आणि निष्ठा ठेवून काम केल्यास त्यात निश्चितपणे यश मिळते असे प्रतिपादन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी रेणापूर येथे विविध क्षेत्रातील समाजाला प्रेरणा देणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींच्या सन्मान सोहळ्यात बोलताना केले.

विविध क्षेत्रात कार्यरत राहून समाजाला प्रेरणा देणाऱ्या कर्तृत्ववान मान्यवरांचा राजमंत्र न्यूज या चॅनलच्या तृतीय वर्धापन दिनाच्या निमित्ताने पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड हे होते या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून हभप तुकाराम महाराज शास्त्री परळी, राष्ट्रवादी काँग्रेसचे अँड व्यंकट बेद्रे, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, महाराष्ट्र पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, भाजपाचे नवनाथ भोसले, अनिल भिसे, महेंद्र गोडभरले, अभिषेक आकनगिरे, अनंत चव्हाण, दशरथ सरवदे, अच्यूत कातळे यांच्यासह इतर अनेक मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी उपस्थित प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते साहित्यिक योगेश गायकवाड, ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, राजकुमार कोळेकर, सुभाष सोनटक्के, कु. ज्ञानेश्वरी राजमाने, चंद्रकांत आरडले, बालाजी कदम, अभिषेक आकनगिरे, तुकाराम दुडिले, महेश कुलकर्णी, कल्पना लंगोटे, स्वप्निल फुले, शरद राठोड, मीनाताई भताने, अमोल मुसळे, वैजनाथ लहाने, जयकांत गीते, शितल बलदवा आदींनी विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा वेगळा ठसा निर्माण केल्याबद्दल त्यांचा पुरस्कार देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब आणि लोकनेते विलासरावजी देशमुख साहेब यांच्या मतदार संघाचे नेतृत्व करण्याची मला संधी मिळाली हे माझे भाग्य आहे. या मतदारसंघात केलेल्या विविध विकास कामाची माहिती देऊन यावेळी बोलताना आ रमेशआप्पा कराड म्हणाले की, सत्य बोलायला मी कधीच भीत नाही मात्र काहीजण जाणीवपूर्वक मागचं पुढचं कट करून असत्य सोशल मीडियाच्या माध्यमातून समाजात घेऊन जात असल्याचा मी अनुभव घेत आहे. समाजात चांगले आणि वाईट अशा प्रकारच्या दोन्ही बाजू असतात, वाईटाकडे दुर्लक्ष करून चांगल्या बाजूचा प्राधान्याने विचार करावा आणि त्या अधिक चांगल्या कशा होतील यासाठी तसेच समाजा – समाजातील एकोपा कायम राहावा यासाठी पत्रकारांनी आपल्या लेखणीतून काम करावे असे बोलून दाखविले.



मौलिक योगदान असल्याने पुरस्कार मिळतो हीच कामाची पावती असते अशा पुरस्कारातून प्रेरणा मिळते असे सांगून पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे अभिनंदन करून यावेळी बोलताना हभप तुकाराम महाराज म्हणाले की, आभाळाला हात लावण्याची उंची असतानाही ज्यांचे पाय जमिनीवर असतात अशा कराड कुटुंबीयात जन्म घेतलेले रमेशआप्पा कराड हे कर्तत्व, नेतृत्व आणि दातृत्वाच्या त्रिवेणी संगमातील उगवता सूर्य आहेत. आमदार आप्पांना नामदार पाहण्याची अनेकांची इच्छा असल्याचे त्यांनी बोलून दाखविले.

मागील काळात लातूर आणि रेणापूर हे दोन्ही मतदारसंघ देणाऱ्याचे होते दोन्हीचा लातूर ग्रामीण एक मतदार संघ झाला असून रमेश आप्पांच्या माध्यमातून हा मतदारसंघ मागणाऱ्याचा नव्हे तर देणाऱ्याच्या भूमिकेत यावा अशी अपेक्षा व्यक्त करून अँड व्यंकट बेद्रे यांनी पत्रकारितेचे दिवस बदलत आहेत तंत्रज्ञानाच्या या युगात विश्वाहर्तेचा प्रश्न असल्याचे बोलून दाखवले. तर जयप्रकाश दगडे यानी पत्रकारिता हे सतीचे वाण आहे पत्रकारांना अनेक आव्हाने स्वीकारावी लागतात टीका केली तर कोणालाही सहन होत नाही मात्र समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी न्याय देण्यासाठी पत्रकारितेला समाजाने जिवंत ठेवले पाहिजे असे बोलून दाखविले.

यावेळी चंद्रकांत आरडले, योगेश गायकवाड, राजकुमार होळीकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले प्रारंभी सुधाकर फुले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर शेवटी विष्णू आचार्य यांनी आभार व्यक्त केले उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे स्वागत सुधाकर फुले, वाल्मीक केंद्रे, शरद राठोड, अनिल फुलारी, मधुकर गालफाडे, सतीश जाधव, विष्णू आचार्य, गोपाळ चिताडे संजय माकेगावकर, उमेश जोशी, स्वप्निल फुले यांच्यासह अनेकांनी केले कार्यक्रमास विविध क्षेत्रातील अनेक जण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पथविक्रेत्या करिता लोक कल्याण मेळाव्याचे आयोजन शहरातील पथविक्रेत्यांनी लाभ घ्यावा – मनपा आयुक्त मानसी यांचे आवाहन

लातूर/ प्रतिनिधी: केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेची पुनर्रचना करून सदर योजनेला माहे मार्च २०३० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे शहरातील फेरीवाले , छोटे व्यावसायिक यांना याचा लाभ होणार आहे. आयुक्त मानसी यांच्या आदेशानुसार व उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांच्या मार्गदर्शनानुसार सदर योजने अंतर्गत दिनांक १७ सप्टेंबर ते दिनांक ०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत लोक कल्याण मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. यात नवीन कर्ज प्रस्ताव स्वीकारणे, प्रस्ताव मंजूर करणे, वाटप करणे , फेरीवाले यांचे डिजिटल ओंनबोर्डिंग करणे, फेरीवाले यांचे स्ट्रीट फूड फेरीवाले यांचेसाठी प्रशिक्षण आयोजित करणे हे कामे केली जाणार आहेत. प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी या योजनेत सुधारणा करून पहिले कर्ज मर्यादा १००००/– रु. वरून १५०००/– रु. , दुसरे कर्ज मर्यादा २००००/– रु. वरून २५०००/– रु. , इतकी वाढविण्यात आली असून तिसरे कर्ज ५००००/– रु. असणार आहे. याशिवाय योजनेचा लाभ घेणारे ज्यांनी दुसरे कर्ज वेळेवर नियमितपणे परतफेड केली आहे अशा लाभार्थ्यांना क्रेडीट कार्ड दिले जाणार आहे. त्यामुळे अचानक उद्भवणाऱ्या व्यवसाय व वैयक्तिक अडचणीसाठी तात्काळ आर्थिक मदत मिळू शकेल. तसेच योजने अंतर्गत फेरीवाले यांना डिजिटल व्यवहारावर लरीहलरलज्ञ मिळणार आहे. त्यामुळे डिजिटल पद्धतीने व्यवसाय करायला प्रोत्साहन मिळेल. याशिवाय शहरातील स्ट्रीट फूड फेरीवाले यांचेसाठी स्वच्छता व अन्न सुरक्षा याबाबत प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. तरी शहरातील जास्तीत जास्त पात्र फेरीवाले यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त मानसी यांनी केले आहे.



## करकट्टा सोसायटी भाजपाच्या ताब्यात; आ. कराड यांच्या हस्ते नुतन सदस्यांचा सत्कार



लातूर : – लातूर तालुक्यातील मौजे करकट्टा येथील सेवा सहकारी सोसायटीच्या निवडणुकीत भाजपाच्या शेतकरी विकास पॅनलने सर्वच्या सर्व ११ पैकी ११ जागा जिंकून सोसायटीवर वर्चस्व सिद्ध केले आहे. लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी या निवडणुकीतील नवनिर्वाचित सोसायटी सदस्यांचा सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले.

भाजपाच्या नेतृत्वातील शेतकरी विकास पॅनलने सर्वच्या सर्व जागा जिंकत करकट्टा येथील सेवा सहकारी सोसायटीच्या निवडणुकीत बाजी मारली. या निवडणुकीत विजय प्राप्त केलेल्या रमेश शिंदे, बालासाहेब इंगळे, भाऊसाहेब शिंदे, हरिभाऊ माने, मिनाबाई शिंदे, जनाबाई इंगळे, रामलिंग गायकवाड या सोसायटीच्या नवनिर्वाचित संचालकांचा भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी सोमवारी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात सत्कार करून अभिनंदन केले.

येत्या काळात शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात आणि सोसायटीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मदत करावी अशा सूचना आ. रमेशआप्पा कराड यांनी नवनिर्वाचित सदस्यांना केल्या. याप्रसंगी संजय गांधी निराधार योजना समितीचे लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, माजी अध्यक्ष वैभव सापसोड, बालाजी पठाडे, जनक इंगळे, ईश्वर शिंदे, बाळासाहेब शिंदे, सुरेश शिंदे, बंडू माचवे यांच्यासह अनेक जण होते.




नोट – सर्वांना निमंत्रण पत्रिका दिली आहे तरीसुद्धा कुणाला मिळाली नसेल तर हीच निमंत्रण पत्रिका समजून उपस्थित राहावे ही साकळे परिवाराच्या वतीने विनंती


## जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून तत्काळ सरसकट मदत द्यावी माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

लातूर/प्रतिनिधी :– जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच मोठ्या प्रमाणात पाऊस पडत आहे. गेल्या दोन ते अडीच महिन्यापासून सातत्याने पाऊस पडत आहे. गेल्या पंधरा दिवसात तर जिल्ह्यातील बहुतांश भागामध्ये ढगफुटी सदृश्य पाऊस पडला आहे. या कारणाने जिल्ह्यात सर्वत्र पाणीच पाणी झाले असून शेती पिकासह जमिनीचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. जिल्ह्यात खरीप हंगामात सर्वाधिक पेरा असलेला सोयाबीनचे १०० टक्के नुकसान झालेले असून खरीपाचा हंगाम हातातून गेला आहे. रब्बीची पेरणीही होईल की नाही याबाबत शंका व्यक्त होत आहे. या सर्व बाबींचा विचार करून जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करत तत्काळ सरसकट मदत करण्यात यावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाच्या माध्यमातून माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केली आहे. जिल्ह्यात जुलै महिना अखेरपासून सप्टेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत सतत पाऊस पडत आहे. गेल्या काही दिवसांत तर जिल्ह्यात सर्वत्रच मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असून आगामी काही दिवस असाच पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. जिल्ह्यातील बहुतांश भागात ढगफुटी सदृश्य पाऊस पडलेला आहे. या परिस्थितीने जिल्ह्यात सर्वत्र पाणीच पाणी झाले असून शेती पीकासह शेतजमिनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. अनेकांच्या शेतातील माती वाहून गेल्या असून जमिनीही खरडल्या गेल्या आहेत. जिल्हयात खरीप हंगामात सर्वाधिक पेरा असलेले सोयाबीनचे पीक शंभर टक्केहातातून गेलेले आहे.त्याच बरोबर खरीप हंगामातील इतर पिकांचेही मोठे नुकसान होवून शेतकरी मोठ्या संकटात सापडलेला आहे. या पावसामुळे अनेक घरांमध्ये पाणी शिरून घरांचे नुकसान झालेले आहे. जिवित हानी होवून पशुधनही दगावले गेले आहेत. या परिस्थिती शेतकरी व सर्वसामान्य नागरीक हवालदिल झालेला असून जिल्हा जलमय झालेला आहे. या सर्व बाबींचा विचार करून जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली असल्याची माहिती माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली आहे. शासकीय यंत्रणेने जे पंचनामे केले आहेत. ते ग्राह्य धरून सरसकट मदत मिळावी, अशीही मागणी आपण केली असून ओल्या दुष्काळांतर्गत येणारी सर्व मदत जिल्ह्यातील शेतकरी व नागरिकांना तत्काळ मिळावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांना निवेदन देवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आलीआहे. या सर्व परिस्थितीत शेतकजयांनी हताश होवू नये, असे आवाहन करून बळीराजाच्या पाठिशी सरकार खंबीरपणे उभे राहील अशी ग्वाही माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी यावेळी दिली आहे.



## संपादकीय

# व्हिसाचे दबावतंत्र...

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हिसा धोरणात बदल केला असून, यापुढे एच–१ बी व्हिसासाठी अमेरिकन कंपन्यांनी प्रत्येक कर्मचार्यांसाठी प्रतिवर्षी एक लाख डॉलर म्हणजेच ८८ लाख रुपये भरण्याची तरतूद केली. या निर्णयाचा फटका अमेरिकेतील आयटी कंपन्यांना बसणार आहे. या व्हिसाचा फायदा भारतीय नागरिकांना अधिक प्रमाणात झाला असल्याने नवीन तरतूद म्हणजे एकप्रकारे अमेरिकेचे भारतविरोधी दबावतंत्रच म्हणावे लागेल. या नव्या नियमांमुळे भारतीय व्यावसायिकांसह जगभरातील कुशल कामगारांना मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. नव्या नियमांनुसार, काही एच–१ बी व्हिसाधारकांना आता थेट अमेरिकेत नॉनइमिग्रंट कामगार म्हणून प्रवेश मिळणार नाही. यासोबतच अर्जासाठी लागणार्या शुल्कात मोठी वाढ केली गेली.

गुगल, मायक्रोसॉफ्ट, ॲमेझॉन यांसारख्या मोठ्या टेक कंपन्यांना त्याचा फारसा फरक पडणार नाही. कारण, त्या आधीच उच्च कुशल व्यावसायिकांवर मोठा खर्च करत असतात; मात्र यामुळे छोटे टेक फर्म आणि स्टार्टअप्सवर मोठा आर्थिक दबाव येऊ शकतो, ज्यामुळे त्यांना विदेशी कर्मचारी नियुक्त करणे कठीण होईल. 'एच–१ बी व्हिसा प्रणालीचा सर्वाधिक गैरवापर झाला. याचा मूळ उद्देश अमेरिकेत उच्च कुशल लोकांना कामासाठी आणणे हा आहे. शुल्कात वाढ करून हे सुनिश्चित करू इच्छितो की, जे लोक अमेरिकेत येत आहेत, ते खरोखरच उच्च पात्र आहेत आणि त्यांची नियुक्ती अमेरिकी कर्मचार्यांच्या जागी केली जात नाही', असे अमेरिकन प्रशासनाकडून सांगितले जात आहे. जगाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारा आणखी एक महत्त्वाचा निर्णय अमेरिकेत झाला.

मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हच्या (फेड) व्याजदरातील पाव टक्क्यांच्या कपातीनंतर यावर्षी आणखी दोन व्याजदर कपातींची शक्यता दर्शवली जाते. त्यामुळे जगभरातील बाजारपेठांत आनंदाचे वातावरण पसरले. या कपातीमुळे तेथील व्याजदर चार ते सव्वाचार टक्क्यांच्या श्रेणीत गेले. वाढता महागाई दर आणि थंडावलेली नवीन रोजगारनिर्मिती पाहता, ही कपात चालू वर्षात आणखी दोनदा शक्य असल्याचे संकेत फेडचे अध्यक्ष जेरॉम पॉवेल यांनी दिले आहेत. गेल्यावर्षीच्या सप्टेंबरात अमेरिकेतील भाववाढीने ४० वर्षांतील उच्चांक पातळी मोडली. त्या अगोदरच्या चार वर्षांत अमेरिकेने व्याजदर कपात केली नव्हती; मात्र २०२४ मध्ये फेडरल रिझर्व्हने व्याजदरात ५० आधारबिंदू म्हणजे अर्ध्या टक्क्याची कपात करून, व्याजदर पावणेपाच ते पाच टक्क्यांच्या पातळीवर नेले.

व्याजदर कपातीचा लाभ सामान्य नागरिकांपासून ते व्यापारी व उद्योजकांपर्यंत सर्वांनाच होतो. कर्जे आधीपेक्षा स्वस्त होऊन व्याजावरील खर्च कमी होतो. ग्राहकांना कमी दरात कर्ज उपलब्ध होते. कर्ज घेण्याचा खर्च कमी होत असल्यामुळे कंपन्यांचा नफा वाढतो. गेल्यावर्षीप्रमाणे यावेळीही भारतात शेअर बाजारात फेडच्या व्याजदर कपातीचा सकारात्मक परिणाम दिसून आला. शेअर बाजारात सलग तिसर्या दिवशी तेजीची मालिका सुरू राहून, सेन्सेक्स ३२० अंकांनी वाढून ८३ हजारांवर जाऊन स्थिरावला. 'फेड' व्याजदर कपातीचा परिणाम होऊन भारतात मजबूत परकीय गुंतवणूक होणे अपेक्षित आहे. भारत–अमेरिकेतील द्विपक्षीय व्यापार करारावर अमेरिकी अधिकार्यांसोबत सकारात्मक चर्चा झाली.

अमेरिकेने भारतावर ५० टक्के आयात शुल्क लादल्याने दोन्ही देशांतील संबंध ताणले गेल्याच्या पार्श्वभूमीवर ही चर्चा महत्त्वाची होती. पुढील ८ ते १० आठवड्यांत अमेरिकेसोबत व्यापार करार होईल, अशी खात्री भारताचे मुख्य आर्थिक सल्लागार अनंत नागेश्वरन यांनी व्यक्त केली. गेल्या तीन महिन्यांत भारताची जीडीपी वाढ ७.८ टक्के राहिली. कोरोनानंतर देशाची अर्थव्यवस्था वेगाने विस्तारत असून उत्पादन, सेवा आणि कृषी क्षेत्रांतील वाढ येत्या दोन वर्षांत विकासास हातभार लावण्याची चिन्हे आहेत. जीएसटी सुधारणांमुळे लोकांच्या हातात जास्त रोख शिल्लक राहणार आहे. ती नित्योपयोगी खर्चात रूपांतरित झाल्याने अर्थव्यवस्थेत दोन लाख कोटी रुपयांची भर पडेल, असा विश्वास केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनीही व्यक्त केला आहे.

जीएसटी सुधारणांनंतर १२ टक्के दर टप्प्यातील ९९ टक्के वस्तू या पाच टक्के दरांच्या श्रेणीत आल्या आहेत. तसेच २८ टक्के कर टप्प्यात मोडणार्या ९० टक्के वस्तूंचा १८ टक्के दर श्रेणीत समावेश झाला. सोमवारपासून नवीन जीएसटी दर प्रणालीची अंमलबजावणी होणार असली, तरी ग्राहकोपयोगी क्षेत्रातील अनेक बड्या कंपन्यांनी आधीच स्वेच्छेने दर कपात केली. २०१८ मधील जीएसटी संकलन सुमारे सात लाख कोटी रुपयांवरून २०२५ मध्ये २२ लाख कोटी रुपयांवर जाऊन पोहोचले आहे. करदात्यांची संख्या पूर्वीच्या ६५ लाखांवरून दीड कोटींवर गेली. राज्यांना आता राज्य जीएसटी (एसजीएसटी) दरांचे अनुकरण करावे लागेल आणि ते अधिसूचित करावे लागेल. जीएसटीअंतर्गत महसूल केंद्र व राज्यांमध्ये समान प्रमाणात वाटला जातो. बहुतेक वस्तूंवरील दर कपातीमुळे आता या दरांचा फायदा ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी व्यवसाय–उद्योगांवर असेल. सोमवारी घटस्थापनेने नवरात्रौत्सवाची सुरुवात होत असून, दसरा–दिवाळी खरेदीसाठी बाजारपेठा फुलून जातील. 'आयफा'तर्फे गेल्याच आठवड्यात मुंबईत झालेल्या स्टील महाकुंभ कार्यक्रमात महाराष्ट्र सरकारच्या उद्योग विभागाने ९ कंपन्यांशी ८० हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले. गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, रायगड, छत्रपती संभाजीनगर, सातारा जिल्ह्यांत हे प्रकल्प उभारले जातील. या गुंतवणुकीमुळे विदर्भ, मराठवाडा आणि कोकणातील औद्योगिक विकासाला गती मिळणार असून, स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. महाराष्ट्रात २०३० पर्यंत ५६ टक्के वीज अक्षय ऊर्जेतून येणार आहे. २०२६ पर्यंत शेतकर्यांना दिली जाणारी १६ हजार मेगावॅट वीज सौरऊर्जेद्वारे मिळेल. त्यामुळे सबसिडी कमी होऊन उद्योगांसाठीचे वीज दर पुढील ५ वर्षांत टप्प्याटप्प्याने घटण्याची अपेक्षा आहे. देशभरातील खासगी क्षेत्रातील गुंतवणुकीचे चक्र मंदावलेलेच आहे, असे 'एस अँड पी ग्लोबल'ने सूचित केले असले, तरी 'क्रिसिल'ने मात्र २०२५–२६ मध्ये भारताचा वास्तविक जीडीपी ६.५ टक्के असेल, असे म्हटले आहे. जागतिक अस्थिरता कायम असली, तरी त्यातून मार्ग शोधावा लागेल.

# जालिनीचं पान त्याला इतिहासाचा मान

ज्या दिवशी तथागत भगवान बुध्दानी पंचवगय भिक्खूना दीक्षा दिली. तो दिवस होता आषाढ पौर्णिमेचा, आणि बुध्दांनी जतिनीच्या जंगलात अंगुलीमालास दीक्षा दिली तो दिवसहि पौर्णिमेचाच होता तर मी युध्द करणार नाही अशी प्रतिज्ञा करणारा सम्राट अशोकाला दिक्षा दिली तो दिवस होता शुद्ध दशमीचा याला अशोका विजयादशमी म्हणतात. तसेच याला दसरा म्हणतात, तर विजयादशमी दिवशी नदीकाठी नागपूरला राष्ट्रनिर्माते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आबेडकरानी आपल्या लाखो बांधवाना दीक्षा दिली याला धम्मचक्र प्रवर्तन म्हणतात म्हणून बुद्ध हाच जगाचा वाली या देशाचा इतिहास हा बौध्द धम्माचा इतिहस आहे. ८४ हजार बौध्द विहार, लेण्या, स्तूप इथे असून १८ बौध्द विद्यापीठ होते. समता बंधूता करुणा व न्याय इथे होती. सा–या जगातून विद्या इथे येत होती. हा देश जगाचा मार्गदाता होता केवळ बुद्धामुळे. महान चक्रवत सम्राट अशोकाचा नातू बृहद्रथ याने पुष्यमौत्र यास आपला सेनापती नेमळे त्याने विश्वास घाताने बृहद्रथ ठार केले अनेक बौद्ध भिक्रकू मारले कित्येक विहार पाडळे कित्येक विहारावर अतिक्रमणझाले विहाराचे मंदिरात रूपांतरण झाले (देवळाचा धर्म आणि धर्माची देवळे, लेखक. थोर विचारवंत प्रभोधनकार ठाकरे पान–४) माझ्या मते ज्या–ज्या मंदिरात हिंसा होत नाही ती बौद्ध विहार आहेत तर ज्या–ज्या मंदिरात हिंसा होते ती इतरांची आहेत. अशा प्रकारे बौद्ध धम्म कमकुवत झाल्या मुळे या देशातील समता बंधुता करुणा व न्याय लयास गेली. मनुस्मृतिचे ली खाण झाले विषमतेचा आणि अंधश्रध्देचा महापूर आला. पूव अज्ञानी लोक अंधश्रध्देला बळी पडत होते. आता शिक्षणेचे अंधश्रध्देचा प्रसार करीत आहेत है देशहिताला मारक आहे म्हणून थोर अभ्यासक कवि वामनदादा कर्डक म्हणतात कीड लागलेली मनूची प्रणाली मनूच्या घराला पाडणार आहे. अशाप्रकारे जातीयते मुळे आणि अंधश्रध्दे मुळे एकीचा अभाव निर्माण झाला. आणि १५० वर्षे देश गुलाम झाला जगातील क्रमांक एक चे विव्दान विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार करून या देशावर उपकार केले आहेत. कविने म्हंटल्याप्रमाने सत धम्माच अस्सली सोनं पारंखल हो माझ्या भीमाने उसाला जस–जस मुळाकडे खातं जाव तस उस गोड लागतो तसा हा समतावादी बंधूतावादी बौद्ध धम्म गोड आहे या धम्मातल्या समतेमुळे हा देश एकसंघ बळशाली झाला. आज जगातला कुठलाहि देश भारताकडे वाकड्या नजरेने पाहु शकत नाही. बाबासाहेबानी म्हटंच्या प्रमाणे शिका–संघटीत व्हा. यामुळे या समाजात ज्ञानाची आवड निर्माण झाली. जयंती असो, दसरा असो, महापरिनिर्वाण दिन असो या वेळी लाखो रुपयाच्या पुस्तकाची विक्री होते. तुमच्या जवळ जर दोन रुपये असले तर एक रुपयाचे पुस्तक घ्या त्यामुळे ज्ञान वाढेल आणि एक रुपयाची आकरी घ्या म्हणजे यामुळे जगता येत, हा समाज ज्ञान–विज्ञानाला मानतो अंधश्रध्देचा धिक्कार करतो म्हणून हा समाज ज्ञानाच्या दृष्टीने इतर सर्व समाजापेक्षा पूढेच आहे. जालिनी जंगलात अंगुलीमाल हा दरोडेखोर लपून बसत होता. माणूस जवळ आला की त्याची हात्या करीत होता. तेव्हा अशा खतरनाक जंगलातून जाण्यासाठी–तथागत निघाले. तथागताना पहाताच तलवार घेवून अंगुलीमाल चालून आला अशा वेळी बुद्ध निशस्त्र व शांत कमरेवर हात ठेवून उभे होते. तैव्हा तो म्हणाला श्रमना थांब तेव्हा तथागत म्हणावे मी तर थांबलोच आहे तू हे दुष्ट कृत्य करण्यापासून केव्हा थांबणार आहेस. तेव्हा तो म्हणाला मी काय कुरु (या झाडाचे पान तोडून आणं अंगुलीमाल पान तोडून आणतो पुन्हा बुद्ध म्हणतात ते पान जोडून ये. तेव्हा हे कसे शक्य आहे असे अंगुलीमाल म्हणाला. तेव्हा बुद्ध म्हणतात ज्यांना जोडता येत नाही त्यांना तोडण्याचा अधिकार नाही. तेंव्हा त्याच्या मनाचे परिवर्तन झाले. भगवंतानी (याला दिक्षा दिली हा महान प्रसंग केवळ बुद्धाच्या आयुष्यात आला. म्हणून या अशा प्रसंगाची साक्ष म्हणून बौध्द क्षेत्र पंढरपूर या ठीकाणी कमरेवर हात ठेवून उभा असलेला बुद्ध आहे. ही घटना ऐतिहासीक असल्याने जालीनी जंगलातील पानाला हा मान मिळाला बुद्धाने हिंसेवर अहिंसेने विजय मिळविला (पंढरीचा पांडुरंग बौद्धीसत्व होता बी. डी. जावळे, पा–१०). अनेक संतानी सुध्दा विठलास बुध्द्धच म्हंटले आहे. धर्म लोपला, अधर्म जहाला है तू न पहाशी त्या लागे बुद्ध रूपे पंढरी नांदशी संत एकनाथ, छत्रपती शिवाजी महाराजानी सुद्धा स्वतापासून समतेची सुरुवात केली होती ते पंचशिल पाळत होते म्हणून ते जनतेचे राजे होते. आमचे ते प्राण आहेत जगाचा उद्धार युद्धाने नव्हे बुद्धामुळेच होणार.

***********

–श्रामनेर पि. एस. कांबळे कसगी

मो–९७६४१२११३३

# नक्षलवादाचा प्रभाव ओसरतोय

देशातील नक्षलविरोधी अभियानाला वेग आला असून यास सरकारला बर्यापैकी यश मिळत आहे. नक्षलग्रस्त भागांचा नकाशा लहान होत चालला आहे. आगामी काळात तो इतिहासजमा होईल का?

छत्तीसगडच्या गरियाबंद जिल्ह्यात ११ सप्टेंबर रोजी सुरक्षा दलाच्या अभियानाला मोठे यश मिळाले. यात सीसी सदस्य मनोज ऊर्फ बालकृष्णसह दहा कट्टर नक्षलवादी मारले गेले. ही चकमक शोभा आणि मैनपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जंगलात झाली. यात एक कोटी रुपयांचे बक्षीस असलेला तेलंगणमधील वारंगलचा रहिवासी ५८ वर्षीय मोडेम बालकृष्ण याचा मृत्यू झाल्याची बातमी खुद्द पोलीस अधीक्षक निखील राखेचा यांनी दिली. नक्षलवाद्यांविरोधातील या कारवाईचे महत्त्व ओळखण्यासाठी गेल्या काही महिन्यांतील छत्तीसगड आणि देशभरातील नक्षलवाद्याविरोधातील मोहिमेचा आढावा घ्यावा लागेल.

मे महिन्यात नारायणपूर अबुझमाड भागात सुमारे पन्नास तास चाललेल्या अभियानात सुरक्षा दलाने दीड कोटी रुपयांचे बक्षीस असलेल्या आणि नक्षलवाद्याचा म्होरक्या नंबाला केशव ऊर्फ बसवराजू याला ठार करण्यात आले. त्याच्या मृत्यूनंतर नक्षलवाद्यांच्या गटांनी सुमारे सहा कोटी रुपयांचे बक्षीस असलेल्या देवजी ऊर्फ संजीव ऊर्फ पल्लवला संघटनेचा नवीन म्होरक्या म्हणून नेमले. त्याचवेळी दंडकारण्य स्पेशल झोनल समितीचे सचिवपद कट्टर नक्षलवादी माडवी हिडमावर सोपविले. तो तेलंगणातील करीमनगर येथे एका सामान्य कुटुंबात जन्मलेला नक्षलवादी असून तो साडेतीन दशकांपासून नक्षल कारवायांत सक्रिय आहे. त्यावर देशभरातील विविध राज्यांनी सहा कोटी रुपयांपेक्षा अधिक बक्षीस घोषित केलेले आहे. यानुसार माडवी हिडमा हा बस्तरच्या बिजापूर जिल्ह्यातील पुवर्ती गावातील रहिवासी असून तो नक्षलवाद्यांच्या कारवाया तडीस नेण्यात माहीर समजला जातो. गेल्या दीड वर्षात छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलाने ४५३ नक्षलवाद्यांना ठार केले आहे. त्याचवेळी १६०२ नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. तसेच १६९१ जणांना अटक केली आहे. सरासरी सहा नक्षलवाद्यांना दररोज अटक केली जात आहे. गृहमंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये देशभरात सुरक्षा दलाने २९० नक्षलवाद्यांना ठार केले असून १०९० जणांना अटक केली आणि ८८१ जणांनी शरणागती पत्करली आहे. २०२५ च्या पहिल्या चार महिन्यांतच १४८ नक्षलवादी ठार झाले आणि १०४ जणांना अटक करण्यात आली. १६४ जणांनी शरणागती पत्करली आहे. एकट्या बस्तर विभागात अनेक मोहिमा राबविण्यात आल्या. त्यात २९ नक्षलवाद्यांना दोन जिल्ह्यातील मोहिमेत कांकेर जिल्हा (१६ एप्रिल २०२४) आणि बिजापूर जिल्हा (९ फेब्रुवारी २०२५) ठार करण्यात आली.

सुरक्षा दलाच्या आक्रमक रणनीतीमुळे नक्षलवाद्यांचे कंबरडे मोडले जात आहे. त्यांना ग्रामस्थांचा मिळणारा पाठिंबा हळूहळू कमी होत आहे. आकडेवारी पाहिली तर मागील वर्षांत देशभरातील सुरक्षा दलाच्या अभियानात एकूण ३५७ नक्षलवाद्यांना ठार करण्यात आले आणि त्यात १३६ महिला नक्षलवादी, चार केंद्रीय समितीचे सदस्य अणि पंधरा राज्य समितीच्या वरिष्ठ सदस्यांचा समावेश होता. दंडकारण्य क्षेत्रातच २८१ नक्षलवादी मारले गेले. छत्तीसगड, झारखंड, तेलंगण, आंध्र प्रदेश, ओडिशासारख्या राज्यांत आता नक्षलग्रस्त भागाची व्याप्ती कमी झाली आहे. त्यामुळे नक्षलवाद्यांची संख्या देखील कमी होत आहे. पूर्वी देशभरातील ३८ जिल्हे नक्षलग्रस्त होते आणि ती संख्या आता सहा जिल्ह्यांवरच आली आहे.

केंद्र सरकारचा उद्देश मार्च २०२६ पर्यंत छत्तीसगडला नक्षलमुक्त करण्याचे आहे. या राज्याने नक्षलवाद्यांचे अनेक घाव सहन केले आहेत. परंतु आता त्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी दुहेरी धोरण अंगिकारले जात आहे. कडक कारवाई करताना दुसरीकडे सर्वंकष विकास कामे. छत्तीसगडमध्ये शरण येणार्या नक्षलवाद्यांसाठी सर्वात मोठे पुनर्विकास धोरण राबविले जात आहे. तीन वर्षांपर्यंत दरमहा दहा हजार रुपये प्रोत्साहन निधी, कौशल्य विकास प्रशिक्षण, स्वयंरोजगार, रोख हस्तांतर, कृषी किंवा शहरात जमीन हस्तांतर यासारख्या उपक्रमाचा समावेश आहे. राज्यातील बदलत्या चित्रावर बोलताना मुख्यमंत्री विष्णूदेव साय यांनी आता बंदुकीची जागा पुस्तकांनी घेतली असून रस्ते कामाचा आवाज ऐकू येत असल्याचे मत मांडले आहे.



नियद नेल्ला नार योजनेनुसार बस्तरच्या दुर्गम भागात रस्ते, वीज, शिक्षण, आरोग्य सुविधा, कार्ड, किसान क्रेडिट, प्रधानमंत्री आवास, मोबाइल टॉवर, वनाधिकार पट्टे यासारख्या सुविधा दिल्या जात आहेत. अधिकार्यांच्या मते, अबूझमाडच्या रेकावाया गावात पहिल्यांदा शाळा सुरू झाली असून कधीकाळी नक्षलवादी स्वत:च शाळा चालवत असत. आतापर्यंत विविध ठिकाणी बंद पडलेल्या ५० शाळा सुरू केल्या असून नवीन बांधकामही सुरू आहे. शिक्षण, आरोग्याच्या सुविधा दुर्गम भागात दिल्या जात आहे. याप्रमाणे नक्षलग्रस्त भागात ग्रामपंचायतीच्या स्तरापर्यंत योजना राबविल्या जात असून शाळा, डिजिटल, साक्षरता, आरोग्य शिबिराचे प्रमाण वाढले आहे. नक्षलवाद्यांच्या कारवायांचे विश्लेषण केल्यास गेल्या सहा दशकांत भारतीय लोकशाहीला नेहमीच आव्हान दिले आहे. २००५ ते १४ या काळात तेरा हजारांपेक्षा अधिक हिंसाचाराच्या घटना घडल्या असून त्यात सुरक्षा दलाचे शेकडो कर्मचारी आणि नागरिक मृत्यूमुखी पडल्याची नोंद झाली आहे. मात्र २०१४ ते २०२५ या काळात नक्षल कारवायांत घट झाली आहे. हिंसाचाराच्या घटना निम्म्यावरच आल्या आहेत. सुरक्षा दलाच्या कर्मचार्यांचे मृत्यूमुखी पडण्याचे प्रमाण ७३ टक्क्यांनी कमी झाले आहे.

अर्थात, नक्षलवाद्यांची विचारसरणी ही लोकशाही, राज्यघटना, न्यायालयास मान्यता देत नाही. हिंसेच्या बळावर तारणहार असल्याचे ते लोकांना सांगण्याचा प्रयत्न करतात. अशावेळी सुरक्षा दल, सरकार आणि समाज या तिघांना एकत्र येऊन अशा विघातक विचारसरणीला मोडीत काढण्याचे काम करावे लागते. नक्षलवादी विचारसरणीचे समर्थक, त्यांचे जाळे, कथित एनजीओ, वकील आणि शिक्षकांवर देखील कारवाई केली जात आहे. शहरातील जाळे मोडून काढणे आणि नक्षलविचारसरणी जमीनदोस्त करण्यासाठी पोलीस, सुरक्षा दल आणि सरकार यांची संयुक्त मोहीम सुरू आहे.

देशात आता नक्षलवाद शेवटच्या घटका मोजत आहे, हे उघड आहे. विकास, सुरक्षा धोरण यांचे सुसंगत धोरण, विकासकामे, पुनर्विकास योजना, जनतेच्या विचारांत बदल या कारणांमुळे कट्टर नक्षलवादी आणि त्यांची फळी कमकुवत होताना दिसत आहे. नक्षलवादविरोधातील मोहिमा अशाच सुरू राहिल्या तर मार्च २०२६ पर्यंत छत्तीसगडच नाही तर देशही नक्षलमुक्त म्हणून जाहीर करणे शक्य होईल. या रक्तरंजीत विचारसरणीतून देशाला मुक्ती मिळवणे हाच खरा लोकशाहीचा विजय मानावा लागेल. गेल्या अनेक काळापासून हिंसाचार, बंडखोरी, दहशतवादाचा सामना करणार्या लोकशाहीने अस्वस्थ राज्यांत विकास, शिक्षण, शांतता प्रस्थापित करण्याच्या दिशेने निर्णायक पाऊल टाकले आहे.

# डिजिटल कितपत सुरक्षित?

गेल्या काही दिवसांत ॲप्समध्ये दडलेले डिजिटल जग उघड केल्याची प्रकरणे घडली आहेत. डिजिटल जगावर डोळे झाकून विश्वास ठेवला जातो आणि त्यास सर्वस्व अर्पण करतो. परिणामी डिजिटल जगात असणारी प्रत्येक वस्तू ही एखाद्या लॉकरप्रमाणे सुरक्षित राहते असा विचार करण्याची चूक कशी झाली? हा खरा प्रश्न आहे. मानवाच्या बुद्धीचा विकास कालानुरूप झाला असून तो डिजिटल जगाच्या तुलनेत अतिशय वेगळ्या पद्धतीने म्हणजे वास्तवावर आधारित झाला आहे. तरीही गेल्या काही दशकांपासून, प्रामुख्याने पंधरा वर्षांपासून इंटरनेट, सोशल मीडिया आणि एआयसारख्या तंत्रज्ञानाच्या प्रगतीने मानवाच्या दैनंदिन जीवनावर परिणाम झाला आहे. आपल्या संवादात, ज्ञान मिळवण्यात आणि जगासमोर प्रकट होण्याच्या पद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणला. यानुसार आपण डिजिटल युगाच्या आहारी गेलो आणि तेच आपले जग असल्याचे मानू लागलो.

फिर्थ जे फॉम आणि त्यांच्या साथीदारांनी अभ्यास अहवाल 'फॉम ऑनलाइन ब्रेन्स टू ऑनलाइन लाइव्हस अंडरस्टँडिंग द इंडिविजुअलाइज्ड इम्पॅक्ट ऑफ इंटरनेट युज अक्रॉस इंडिव्हिज्युअल्ड इम्पॅक्टस ऑफ इंटरनेट अक्रॉस सायकॉलॉजाइॅड कॉग्निटिव्ह अँड सोशल डिमेन्सन्स' मध्ये म्हटल्यानुसार तंत्रज्ञानाच्या प्रचंड वेगामुळे मेंदूतील वास्तवाला धरून असलेली विकासाभिमुख रचना आणि आधुनिक डिजिटल संस्कृतीकडे वाढता ओढा यात ताळमेळ बसवताना तारांबळ उडताना दिसते. २०१९ मध्ये 'सायकियाट्रियत' प्रकाशित फिर्थ यांचा अभ्यास अहवाल 'द ऑनलाइन ब्रेन : हाऊ द इंटरनेट' यात त्यांनी 'बी चेंजिंग ऑर कॉग्निशन' लेखात मानवी मेंदूची संरचना आणि डिजिटल आक्रमण यात सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. यात म्हटल्यानुसार, आपल्या मेंदूवर एक वास्तविक विकासवादी इतिहासाची छाप असून त्याची सजीवता ही नैसर्गिक वातावरणातील सजगता आणि सुक्ष्म घडामोडींच्या सामाजिक गतीशीलतेवर अवलंबून आहे.

मेंदूची रचना आणि त्याची कार्यप्रणाली ही प्रत्यक्षात काळानुसार प्रस्थापित होणारे सामाजिक संबंध, मौलिक माहिती आणि तत्कालिन काळातील भौतिक स्थितीनुसार विकसित झाली आहे. आजच्याप्रमाणे ऑनलाइन माहितीच्या आधारे बुद्धीचा विकास झालेला नाही. अर्थात मेंदू असामान्य रुपाने लवचिक नाही. देहाने आणि कोहेन यांनी 'कल्चरल रिसायकलिंग ऑफ कॉर्टिकल मॅप्स: हाऊ रीडिंग अँड मॅथमॅटिक्स रिशेप ह्युमन कॉर्टेक्स, न्यूरॉन' मध्ये मेंदूच्या अशा प्रकारच्या विकासाच्या स्थितीला बायोलॉजिकल अबस्ट्रॅट असे म्हटले आहे. (जैविक अडथळा) आपण मानवी जीवनातील डिजिटल घडामोडींचा विचार करतो तेव्हा हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. इंटरनेट, सोशल मीडिया आणि एआयने गेल्या काही दशकांपासून क्रांती घडवलेली असून तो मोठा अविष्कार मानला जातो. तंत्रज्ञानाच्या अभूतपूर्व गतीने मानवी मेंदू आणि त्यास अनुसरून क्षमता विकसित करण्याचे एक गंभीर आव्हान निर्माण झाले आहे. कारण यात सांस्कृतिक आणि रचनात्मक मार्गाने नाट्यमय बदल होत असताना विकासाभिमुख प्रक्रियेबरोबर ताळमेळ बसविण्यासाठी मेंदूला पुरेसा कालावधी दिला नाही. ज्या गतीने ही उपकरणे मानवी जीवनात सामावली गेली, तेथे मेंदूची विकासात्मक रचना आणि आधुनिक डिजिटल जग याच्यात ताळमेळ बसताना गोंधळ निर्माण होऊ लागला. म्हणून मेंदूची नैसर्गिक गोष्टी आत्मसात करण्याची क्षमता या वेगाने होणार्या बदलाशी ताळमेळ मिळवू शकते का? आणि त्यात सामावले जात असताना गुंतागुंत निर्माण होईल का?

डिजिटल आणि वास्तविक जग यात फरक असल्याचे मेंदूच्या रचनात्मक स्थितीला जमवून घ्यावे लागणार आहे. म्हणजे एकीकडे वास्तविक जग मान्य करत असताना आभासी जग हा केवळ दिखावा आहे, हे त्याला पटवून घ्यावे लागणार आहे. जेव्हा डिजिटल जवळीकतेचा मुद्दा येतो तेव्हा आतापर्यंतची सामाजिक व्यवस्था पाहिली तर त्याकडे एक फसवे जग म्हणूनच पाहिले गेले आणि कधी कधी तिरस्काराच्या नजरेतूनही बघितले गेले आहे. विशेष म्हणजे याच जगाला आपण सुरक्षित जग म्हणून समजू लागलो आणि तेथेच सर्वस्व अर्पण करू लागलो. पण आभासी जगात सुरक्षेची हमी कोणीच देत नाही. शेवटी या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी मेंदूच्या रचनात्मक पद्धतीत बदल करणे गरजेचे आहे. अर्थात ही दीर्घकाळ प्रक्रिया असली तरी त्याची सुरुवात करणे तितकेच आवश्यक आहे. मानवी मेंदूने डिजिटल जगाचे वास्तव ओळखायला शिकले पाहिजे आणि जगासमोर येणारे आभासी जग हे मानवी बुद्धिमत्तेतून नाही तर मेंदूतील रचनात्मक बदलाच्या प्रक्रियेचा भाग आहे, हे ओळखले पाहिजे. हाच बदल डिजिटल जगात सुरक्षा देण्याचे काम करेल आणि डिजिटल जगात असलेले विश्व हे एखाद्या कुलुपबंद खोलीप्रमाणे सुरक्षित नसून त्याकडे हजारो डोळ्याचे लक्ष असल्याचे मान्य करेल.

सध्याचा समाज अनामिक संघर्षातून जात असून तेथे डिजिटल जगाचे अस्तित्व नाकारले जाणार नाही. परंतु त्याचे वर्तमान काळातील रूप देखील मान्य केले जाणार नाही. प्रामुख्याने जेव्हा डिजिटल जगाशी असलेल्या संबंधाचा मुद्दा येतो तेव्हा आहे तसे स्वरूप मानले जाणार नाही. कारण त्यामुळे मनात निर्माण होणारी असुरक्षितता ही एखाद्या शारीरिक वेदनेप्रमाणेच क्लेषदायी आणि वेदनादायी आहे. सध्याची प्रचलित कायदा आणि सुव्यवस्था वास्तवातील जगात मानसिक आणि शारीरिक हानी पोचवणार्यांना दंड देत असेल तरी तो अद्याप डिजिटल जगातील मानसिक त्रासाला कायद्याच्या चौकटीत घेणारा नाही. त्यामुळे डिजिटल जगाकडून होणारा छळ हा शारीरिक छळापेक्षा कमी नाही, हे मान्य करावे लागेल. त्यामुळे सध्याच्या काळात सामाजिक आराखड्याचा भाग म्हणून डिजिटल व्यवस्था समोर येत असेल तर त्यानुसार कायदेशीर व्यवस्था विकसित करणे गरजेचे असून ती काळाची गरज बनली आहे.

# आय लव्ह मोहम्मद लिहिलेले पोस्टर वर कानपुर पोलिसांनी केलेल्या कार्यवाही विरोधात निषेध उहेझरीं प्रेषिद मोहम्मद पैंगबर यांच्या गौरवात हाजारो मुस्लिम बांधव एकवटले..








लातूर / प्रतिनिधी :- उत्तर प्रदेशातील कानपूर व शहाजानपूर येथे घडलेल्या धर्मभावना दुखावणाऱ्या घटनांच्या निषेधार्थ, लातूर येथील समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने आज एक भव्य व शांततामय निषेध मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा हजरत टीपू सुलतान चौक येथून सुरू होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे समारोप झाला. लाखोंच्या संख्येने मुस्लिम बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून, पूर्णतः शांततेच्या मार्गाने आपली श्रद्धा आणि निषेध व्यक्त केला. कानपूर येथील ख डैंश चेहरारव फलक प्रकरणात काही युवकांनी श्रद्धेने प्रेरित होऊन सार्वजनिक ठिकाणी फलक लावला होता. हा फलक पूर्णतः शांततामय आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या चौकटीत असतानाही त्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले. ही कृती संविधानातील धर्मस्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा स्पष्ट भंग आहे. शहाजानपूर येथे एका व्यक्तीने प्रेषित हजरत मोहम्मद (स.अ.व.) यांच्याविरोधात अत्यंत द्वेषपूर्ण व अपमानास्पद वक्तव्य केल्यामुळे मुस्लिम समाजामध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. या प्रकारची विधाने केवळ धार्मिक भावना दुखावणारी नसून, सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेलाही धोका निर्माण करणारी आहेत. अहमदनगर येथील रामगिरी नावाच्या व्यक्तीनेही हजरत मोहम्मद (स.अ.) यांच्याविरोधात अश्लील आणि खोट्या स्वरूपाची विधाने करून मुस्लिम समाजाचा अपमान केला. त्याच्यावर अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे अशा प्रवृत्ती अधिक बळावल्या आहेत. तसेच महाराष्ट्रातील काही आमदार आणि नेत्यांनी वारंवार मुस्लिम समाजाबद्दल द्वेषमूलक भाष्य केल्यामुळे राज्यात धार्मिक तणाव वाढत आहे. यामध्ये नितेश राणे, संग्राम जगताप आणि गोपीचंद पडळकर यांच्या विधानांचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे. या सर्व प्रकरणांची गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ आणि कठोर कारवाई करावी, अशी समाजाची मागणी आहे. या मोर्चामध्ये सहभागी झालेल्या सामाजिक, धार्मिक व युवक नेत्यांनी आपल्या भाषणांमधून सांगितले की, मुस्लिम समाज शांततेच्या मार्गाने, कायद्याच्या चौकटीत राहून आपले म्हणणे मांडत आहे. श्रद्धेचा आणि धर्माचा अपमान सहन केला जाणार नाही आणि न्याय मिळेपर्यंत संविधानिक मार्गाने संघर्ष सुरू राहील. हा निषेध केवळ भावना व्यक्त करण्यापुरता मर्यादित नसून, तो सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्याचे एक सकारात्मक उदाहरण ठरावा, यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. मुस्लिम समाजाच्या वतीने प्रशासनासमोर विविध मागण्या मांडण्यात आल्या आहेत. कानपूर प्रकरणातील युवकांवरील सर्व गुन्हे तात्काळ मागे घेण्यात यावेत. शहाजानपूर येथील आरोपीविरुद्ध कठोर गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावी. अहमदनगरमधील रामगिरी याच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावी. समाजात द्वेष पसरवणाऱ्या आमदार व नेत्यांवर कायदेशीर व संविधानिक कारवाई करण्यात यावी आणि त्यांची आमदारकी रद्द करण्याच्या दृष्टीने पावले उचलावीत. केंद्र सरकारने धार्मिक भावना दुखावणाऱ्या घटनांवर आळा घालण्यासाठी धार्मिक भावना संरक्षण कायदा लागू करावा. सोशल मीडियावर द्वेष पसरवणाऱ्या खात्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा तयार करण्यात यावी. शाळा व महाविद्यालयांमध्ये धार्मिक सहिष्णुता, मूल्यशिक्षण आणि राष्ट्रीय एकात्मतेवर आधारित अभ्यासक्रम व कार्यक्रम राबवण्यात यावेत. मुस्लिम समाजावर वाढणाऱ्या धार्मिक अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर अनुसूचित जाती-जमातींसाठी जसा ट्रॉसिटी कायदा आहे, तसाच मुस्लिम समाजासाठीही स्वतंत्र संरक्षण कायदा लागू करण्यात यावा. हा संपूर्ण मोर्चा अत्यंत शिस्तबद्ध व शांततेच्या वातावरणात पार पडला. महिलांचा, तरुणांचा, वयोवृद्धांचा, सामाजिक कार्यकर्त्यांचा आणि धर्मगुरूंचा मोठा सहभाग होता. फलक, बॅनर, पोस्टर आणि घोषणांद्वारे समाजाच्या भावना व्यक्त करण्यात आल्या. पोलीस प्रशासनाच्या बंदोबस्तात मोर्चा सुरक्षितरित्या पार पडला. या मोर्चाच्या समारोपस्थळी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत माननीय राष्ट्रपती, पंतप्रधान आणि मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात सर्व मागण्या स्पष्टपणे नमूद करण्यात आल्या असून, या गंभीर घटनांकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. समस्त मुस्लिम समाजाने संविधानिक मार्गाने, अत्यंत संयमित व शांततेच्या वातावरणात आपला निषेध नोंदवून, धर्म, श्रद्धा आणि सन्मान यांच्यावर होणारा अन्याय सहन केला जाणार नाही, हा स्पष्ट संदेश शासन आणि प्रशासनाला दिला आहे.

## लोखंडी कोयता व छऱ्याची बंदूक घेऊन दहशत,भीती पसविणाऱ्याला गांधी चौक पोलिसांनी केली अटक.

लातूर :- लोखंडी कोयता व छऱ्याची बंदूक घेऊन दहशत,भीती पसविणाऱ्याला गांधी चौक पोलिसांनी केली अटक.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक २१/०९/२०२५ रोजी पोलीस स्टेशन गांधी चौक हद्दी मधील बसस्थानक व गंजगोलाई परिसरामध्ये एक तरुण लाल रंगाच्या मोटार सायकल वर बंदूक आणि लोखंडी कोयता घेऊन सार्वजनिक ठिकाणी दहशत माजवत आहे अशी माहिती मिळताच वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड पोलीस स्टेशन गांधी चौक लातूर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस स्टेशन गांधी चौक चे पोलीस अधिकारी व अंमलदार तात्काळ सदर ठिकाणी पोहोचून एका तरुणाला ताब्यात घेतले. त्याच्याकडे एक छऱ्याची बंदूक व एक लोखंडी कोयता मिळाले.

सदरील तरुणाचे नाव फारूक इब्राहिम शेख, वय ३६ वर्ष, राहणार वीरहनुमंतवाडी, कव्वा नाका, असे आहे सदर तरुणाने त्याच्या जवळील यामाहा ठ-१५ या मोसावर बसून हातात छऱ्याची बंदूक व कमरेला असलेला लोखंडी धारदार कोयता बाळगून घेऊन सार्वजनिक ठिकाणी दहशत माजवत असताना मिळून आल्याने पोलीस ठाणे गांधी चौक लातूर येथे गुन्हा नंबर ४३२/२५ कलम २७० बीएनएस ४,५ आर्मएक्ट, १३५ बीपी एक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




सदरील कामगिरी पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) समीरसिंह साळवे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे गांधी चौकचे पोलिस निरीक्षक सुनिल रेजितवाड यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक गणेश चित्ते,अमर केंद्रे, निखिल पवार, पोलिस अंमलदार रवीसन जाधव, संतोष गिरी,सचिन चंद्रपाटले,शिवा भाडुळे, बेंबडे यांनी केली आहे.

## महानगरपालिके मार्फत स्वच्छता हि सेवा पंधरवाडा अंतर्गत प्लास्टिक बंदी जनजागृती रॅली

लातूर/ प्रतिनिधी :- लातूर महानगरपालिके मार्फत शासनाच्या आदेशाप्रमाणे १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर स्वच्छता हि सेवा पंधरवाडा आयोजित करणेबाबत आदेशित केले असून आज दिनांक: २२/०९/२०२५ रोजी गांधी चौक,गांधी मार्केट सुभाष चौक ते हत्ते नगर प्लास्टिक बंदी असल्याने नागरिकांनी प्लास्टिक वापरू नये असे आवाहन करून जनजागृती करण्यात आली ,सदर रॅलीस मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी हिरवाझेंडा दाखवुन मार्गस्थ केले.




भारतामध्ये एकल वापर प्लास्टिक बंदी असून पर्यावरणास मोठ्या प्रमाणात अश्या प्लास्टिक मुळे हानी होत आहे,लातूर शहरामध्ये एकल वापर प्लास्टिक,जवळ बाळगणे,निर्मिती, साठा दंडनीय असून याबाबत जनजागृती होने आवश्यक आहे ,म्हणून स्वच्छता ही सेवा पंधरवाड्यात विशेषतः गांधी चौक ते गंज गोलाई परिसर बाजार पेठ परिसरात याचे जनजागृती करण्यात आले यावेळी अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे,मुख्य स्वच्छता निरीक्षक रवी कांबळे, धोंडिबा सोनावणे, अक्रम शेख , शिवराज शिंदे, सर्व स्वच्छता निरीक्षक, गणेश विद्यालय,व्यंकटेश विद्यालय,शिक्षक आणि विद्यार्थी सहभागी होते.

# जेष्ठ नागरिक संघास राज्यस्तरीय पुरस्कार





लातूर :- आरोग्य. दिव्यांग, आणि ज्येष्ठ नागरिक विभागाच्या वतीने यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई यांनी यशवंतराव चव्हाण ज्येष्ठ नागरिक राज्यस्तरीय कृतज्ञता सन्मान पुरस्कारा करिता प्रस्ताव मागविले होते यात दोन पुरुष वैयक्तिक ,दोन महिला वैयक्तिक ,तृतीयपंथी वैयक्तिक, एक दिव्यांग व्यक्ती वैयक्तिक ,व महाराष्ट्रातून एका संघास पुरस्काराचे आयोजन केले होते.यात ज्येष्ठ नागरिक संघ क्रीडा संकुल लातूरचा प्रस्ताव निवड झाला आहे. महाराष्ट्रातून एका संघास यशवंतराव चव्हाण ज्येष्ठ नागरिक राज्यस्तरीय कृतज्ञता पुरस्कारा करिता निवड झाली आहे.हा मानाचा पुरस्कार वितरण सोहळा दिनांक ५ ऑक्टोबर २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह रोख रक्कम सह वितरण होणार आहे या निवडीबद्दल माननीय श्री. अविनाश देवशटवार आयुक्त समाज कल्याण विभाग लातूर, प्राचार्य सोमनाथ रोडे ,प्राचार्य नागोराव कुंभार ,अडवोकेट कालिदासराव देशपांडे ,डॉक्टर सी.एन.जोशी देवी कुमार पाठक, डॉक्टर बी आर पाटील, प्रभाकर कापसे ,आर के पाटील, व्ही.एन.देशपांडे बसवराज उडगे,सूर्यकांत वैद्य,रामानुज रांदड जयप्रकाश दगडे आदींनी अध्यक्ष आर,बी. जोशी व सचिव प्रकाश घादगिने व सर्व संघातील पदाधिकाऱ्याचे कौतुक करून अभिनंदन केले

## संभाजी महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन व विद्यापीठ वर्धापन दिन उत्साहात संपन्न

मुरुड / महेंद्र आल्टे: बुधवार दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी संभाजी महाविद्यालय मुरुड येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड चा ३१ वा वर्धापन दिन व मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजाचे तर कार्यक्रमाचे मुख्य अतिथी, समाज जागृती शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी, ऍडवोकेट श्री. विजयजी पाटील यांच्या शुभहस्ते राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रपिता महात्मा गांधी व स्वामी रामानंद तीर्थ यांच्या फोटोस पुष्पहार अर्पण करून ध्वजास मानवंदना देण्यात आली. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताचे गायन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा. मधुकर क्षीरसागर यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी हुतात्म पत्करलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना मानाचा मुजरा करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.




## आंतरमहाविद्यालयीन 'अ' विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन

मुरूड / महेंद्र आल्टे : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व संभाजी कॉलेज (कला, वाणिज्य व विज्ञान) मुरुड ता. जि.लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरमहाविद्यालयीन 'अ' विभागीय व्हॉलीबॉल (मुले/मुली) स्पर्धेचे आयोजन शुक्रवार व शनिवार दिनांक २६ व २७/०९/२०२५ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता महाविद्यालयातर्फे करण्यात आलेले आहे. सदरील स्पर्धेसाठी विविध महाविद्यालयातून ७५ ते १०० महिला खेळाडू व १३० ते १४० पुरुष खेळाडू सहभागी होण्याची शक्यता आहे. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयामध्ये विविध समित्यांचे गठण करण्यात आलेले आहे. खेळाडू संघ व्यवस्थापक, मार्गदर्शक व पंच यांच्या निवासाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. स्पर्धेच्या निमित्ताने ध्वजारोहन, स्पर्धेचे उद्घाटन, समारोप व पारितोषिक वितरण सोहळा यासाठी विविध मान्यवरांना निमंत्रित करण्यात आलेले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग प्रमुख प्रा. मधुकर क्षीरसागर, क्रीडा मंडळाचे सदस्य अन्य सहकारी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहेत. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मुरुड पोलिस स्टेशन व ग्रामीण रुग्णालय मुरुड तसेच विश्रामगृह . यांची मदत घेण्यात आलेली आहे. सदर स्पर्धा या मा. श्री. दिलीप दादा नाडे पासिंग व्हॉलीबॉल केंद्र (क्रीडांगण) नरसिंह चौक, अष्टविनायक मंदिर शेजारी, मुरुड येथे होणार आहेत. स्पर्धा आयोजनामुळे मुरुड व परिसरातील क्रीडाप्रेमी नागरीकांमधून उत्साही प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत.

## त्र्यंबकेश्वर पत्रकार हल्ल्याचा निषेध; व्हॉईस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेचे अपर पोलीस आयुक्तांना निवेदन सादर

मुंबई / प्रतिनिधी :- त्र्यंबकेश्वर येथे पत्रकारांवर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ व्हॉईस ऑफ मीडिया पत्रकार संघटना ठाणे जिल्ह्याच्या वतीने अप्पर पोलीस आयुक्त संजय जाधवसाहेब यांना निवेदन देण्यात आले व संघटनेने घटनेचा निषेध नोंदवला आहे. याप्रकरणी हल्लेखोरांचा करून कडक कारवाईची मागणी संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे. दि. २० सप्टेंबर २०२५ रोजी, (शनिवार) त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक येथे वार्ताकनासाठी गेलेल्या झी २४ तास चे ब्यूरो चीफ योगेश खरे, साम टीव्ही चे ब्युरो चीफ अभिजित सोनवणे व पुढारी न्यूज चे ब्युरो चीफ किरण ताजने यांच्यावर स्वामी समर्थ केंद्राजवळील पॉकिंगवर कार्यरत गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींनी दगडफेक, लाथाबुक्यानी भीषण जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात किरण ताजने गंभीररीत्या जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पत्रकारांवर वारंवार होणारे हल्ले हे लोकशाहीला काळिमा फासणारी बाब असून लोकशाहीच्या चौथ्या आधारस्तंभावर घाला घालणारी गंभीर स्वरूपाची बाब आहे. पत्रकार समाजातील सत्य घटनांचा आवाज बनतात. अन्याय, भ्रष्टाचार व सामाजिक प्रश्न प्रकाशात आणण्यासाठी ते ते अहोरात्र परिश्रम घेत असतात. अशा घटकांवर होणारे हल्ले ही अत्यंत निंदनीय व असभ्य बाब आहे. अशा स्वरूपाचे निवेदन सादर करण्यात आले असून सदर प्रकरणातील सर्व हल्लेखोरांना तातडीने अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, राज्यातील पत्रकारांच्या सुरक्षेसाठी शासनामार्फत विशेष उपाययोजना करण्यात यावी, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी शासनाने ठोस व प्रभावी धोरण आखावे.

अशा स्वरूपाची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. हे निवेदन देताना व्हाईस ऑफ मीडिया पत्रकार संघटना ठाणे जिल्हा वतीने कोकण व मुंबई विभाग अध्यक्ष अरुणजी ठोंबरे, ठाणे जिल्हा ग्रामीणचे अध्यक्ष सुरेशजी जगताप, जॉनी डेव्हिड, शरद घुडे, कमाल शेख, संजय गायकवाड, सलीम मंसूरी, भालचंद्र निकुंभ, ताराचंद तायडे, प्रशांत ल .ढोणे यांच्यासह पत्रकार उपस्थित होते.

# लातूर येथे भव्य मोफत आयुर्वेदिक निदान मार्गदर्शन आणि पंचकर्म उपचार शिबिर

### जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा आ. रमेशआप्पा कराड यांचे आव्हान

लातूर : - श्रीमती प्रयाग अक्का कराड आयुर्वेदिक रुग्णालय व संशोधन केंद्र यांच्यावतीने राष्ट्रीय आयुर्वेद दिनानिमित्ताने भव्य मोफत आयुर्वेदिक निदान, मार्गदर्शन आणि केरळीय पंचकर्म उपचार शिबिराचे येत्या २३ सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर दरम्यान लातूर येथील एमआयटी परिसरात असलेल्या श्रीमती प्रयागअक्का कराड आयुर्वेद रुग्णालय व संशोधन केंद्र येथे आयोजित करण्यात आले आहे तेंव्हा गरजू रुग्णांनी अधिकाधिक संख्येनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आव्हान कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड यांनी केले आहे.

विविध प्रकारच्या रुग्णांना त्यांच्या आजाराचे आयुर्वेदिक निदान व्हावे त्यांना मार्गदर्शन करता यावे आणि ज्यांना गरज आहे अशा रुग्णांवर केरळी पंचकर्म उपचार करण्यासाठी श्रीमती प्रयागअक्का कराड आयुर्वेद रुग्णालय आणि संशोधन केंद्राच्या वतीने येत्या २३ सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर दरम्यान सकाळी नऊ ते दुपारी पाच वाजेपर्यंत पंधरा दिवसाचे मोफत शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरात पचनाचे विकार, पित्ताचे विकार, बीपी, शुगर, गर्भसंस्कार, संधिवात, सांधे विकार, मणक्याचे आजार, त्वचा विकार, कॅन्सर, हृदयविकार व वंध्यत्व, हृदयवाहिनीतील ब्लॉक, लकवा, ॲलर्जी, उंची वाढवणे, भगंदर, फिशर, सर्दी जुलाब यासह विविध आजाराचे निदान करून उपचार केले जाणार आहेत.

श्रीमती प्रयागअक्का कराड आयुर्वेद रुग्णालयात उच्चशिक्षित व अनुभवी तज्ञ आयुर्वेद डॉक्टर, अद्यावत व सुसज्ज बाह्य रुग्ण विभाग, शंभर खाटांचे अंतर रुग्ण विभाग, अद्यावत स्त्री आणि पुरुष केरळीय पंचकर्म विभाग, प्रशिक्षित व अनुभवी पंचकर्म थेरेपिस्ट, फिजीओथेरेपी विभाग, आजार आणि प्रकृतीनुसार योग, व्यायाम, आहार याबाबतचे मार्गदर्शन यासह उपचार सुविधा उपलब्ध आहेत.



शिबिरात रक्त, लघवी, एक्स-रे, सोनोग्राफी, पंचकर्म, भंगदर, मुळव्याध व क्षारसूत्र ऑपरेशन यावर पन्नास टक्के सवलत दिली जाणार आहे तेव्हा लातूर शहर आणि ग्रामीण भागातील विविध आजाराच्या रुग्णांनी आयुर्वेदिक निदान व मार्गदर्शन आणि केरळीय पंचकर्म उपचार शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आव्हान कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड, एमआयटी परिसर समन्वयक पृथ्वीराज कराड, प्रशासकीय व शैक्षणिक संचालिका डॉ. सरिता मंत्री, श्रीमती प्रयाग अक्का कराड आयुर्वेद रुग्णालय व संशोधन केंद्राचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत चाटे, उप प्राचार्य सतीश बंडगर आणि रुग्णालय अधीक्षका दिप्ती चेवले यांनी केले आहे.

# चवदार तळे सत्याग्रह शतक महोत्सव जागतिक स्तरावर करण्याचा बौद्धजन पंचायत समितीचा मानस संवाद मेळाव्यात सरसेनानी आनंदराज आंबेडकरांची स्पष्टोक्ती



मुंबई :– जगात प्रथमच पाण्याला आग लावून विषमतावादी मनूला मातीत गाडून माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड क्रांतिभूमीत मिळवून दिला त्या ऐतिहासिक घटनेस १०० वर्षे पूर्ण होत आहेत म्हणूनच हा शतकोत्सव देश विदेशातील विविध संघटनांच्या मान्यवरांना निमंत्रित करून त्यांना सोबत घेऊन बौद्धजन पंचायत समितीच्या अधिपत्याखाली आयोजित करण्याचे योजले आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ज्या ज्या लोकांनी या सत्याग्रहात मदत केली त्यांच्या वारसदारांना बोलवून सन्मानित करणे, परिषदा आयोजित करणे, मेळावा घेणे असे अनेकविध उपक्रम आपण वर्षभरात राबविणार आहोत याकरता सर्व शाखा पदाधिकाऱ्यांची आम्हाला साथ हवी आहे असे आवाहन बौद्धजन पंचायत समितीचे सभापती, इंदू मिलचे प्रणेते सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी संवाद मेळाव्यात बोलत असताना केले.

संवाद मेळाव्यात उपस्थितांना संबोधित करताना आनंदराज आंबेडकरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच देशातील पहिलं स्मारक आपल्या श्रमातून आपण निर्माण करीत आहोत त्यासाठी आपण जे अमूल्य योगदान दिले, इंदू मिलची ही जागा आपण आपल्या ताकदीवर मिळवली ते सर्व तुमच्या सर्वांच्या मदतीमुळे झाला तरी महाड क्रांतीभूमीचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आपण मला व बौद्धजन पंचायत समितीला साथ द्यावी, आमचे हात बळकट करावे, आपण आताच कामाला लागून घेतले कार्य पुर्णत्वास नेण्यास आम्हाला सहकार्य कराल अशी मी आशा बाळगतो. धम्माला किंवा सामाजिक संस्थेला राजाश्रय असल्याशिवाय तो धम्म किंवा सामाजिक संस्था गतिशील होत नाही हाच धागा धरून मी माझ्या बौद्धजन पंचायत समितीचा कार्यकर्ता हा नगरसेवक, आमदार व्हावा त्यांना सत्तेच्या केंद्रस्थानी जागा मिळावी या माझ्या स्वप्नाला मूर्तरुपात आणण्यासाठी मी पक्षाच्या वतीने शिवसेनेशी युती केली आहे, आज राजकारणातील परिस्थिती पाहता देशातील कोणत्याही पक्षाला युती केल्याशिवाय पर्याय नाही, आपला समाज अल्पप्रमाणात मोडतो बौद्धजन पंचायत समितीची मोठी ताकद असून ती वाया जाऊ नये, समाजाच्या हितासाठी, कार्यकर्त्यांना संधी मिळण्यासाठी मी युती करण्याचा प्रयोग करीत आहे. बौद्धजन पंचायत समिती ही सामाजिक संघटना असून त्यात राजकारण येता कामा नये याच मला भान आहे परंतु कोणी जाणूनबुजून गैरसमज पसरवत असेल, अफवा पसरवत असतील तर त्यापासून आपण सावध राहिले पाहिजे, बौद्धजन पंचायत समिती ही सामाजिक संघटना अबाधित राहूनच आपल्या कार्यकर्त्यांना संधी देऊन त्यांना मुख्यप्रवाहात आणण्याचा आपला प्रयत्न आहे असे आपले मत स्पष्ट केले.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद जाधव यांनी आपल्या पहाडी आवाजात अत्यंत प्रभावी व लाघवी भाषाशैलीत केले. बौद्धजन पंचायत समितीचे उपसभापती व संवाद मेळाव्याचे अध्यक्ष विनोद मोरे यांनी अध्यक्षीय भाषणात मुंबईतील १२ महानगरपालिका, नगरपालिका यामध्ये फक्त आपल्या कोकणस्थ बांधवांचे मतदान किती आहे याची आकडेवारी अभ्यासपूर्वक मांडून आपले नगरसेवक किती येऊ शकतील याचे अंदाजपत्रक सादर केले, म्हणून आपल्या समाजातील कार्यकर्ता खऱ्या अर्थाने मुख्य राजकीय प्रवाहात येऊन सत्तेच्या केंद्रस्थानी आला तर तो संधीच सोन करेल म्हणून आपण सरसेनानी आनंदराज आंबेकरांना मदत केली पाहिजे असे मत व्यक्त केले. सदर प्रसंगी कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, दक्षिण मुंबईचे अध्यक्ष भगवान साळवी, विठ्ठल जाधव, मनोहर मोरे, प्रकाश कासे, महेंद्र पवार, अशोक कांबळे आदींनी आपले शुभेच्छापर विचार व्यक्त केले. संदीप लोखंडे विभाग क्र. १/२५०, विकास पवार, दीपक कांबळे विभाग क्र.२, शाखा क्र. २८/ २६५, किशोर कांबळे विभाग क्र. ४, शाखा क्र. २६४, विभाग कोषाध्यक्ष प्रविण तांबे विभाग क्र. १३, शाखा क्र.२१६ आणि इतर सतरा विभागातील मान्यवर कार्यकर्त्यांनी युतीचे स्वागत करून आनंदराज आंबेडकरांनी केलेल्या आवहानाल विभागांच्या वतीने पाठिंबा जाहीर केला. सरतेशेवटी स्थानिक गटप्रमुख राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे यांनी सदर संवाद मेळावा यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे तसेच मेळाव्याला सतरा विभागातील उपस्थित मान्यवर कार्यकर्त्यांचे व सर्वांचे आभार मानून संवाद मेळाव्याची सांगता केली.

# धम्मप्रेमी हा नेहमीच उन्नतीपथावर जातो तर धम्मद्वेषी हा कायमच अधोगतीच्या मार्गावरील वाटसरू असतो – प्रशांत मोहिते




मुंबई :– भगवान तथागत गौतम बुद्ध श्रावस्ती येथे असताना एके रात्री एक देवता संपूर्ण जेतवन प्रकाशित करीत तथागतांजवळ आली व भगवंताला वंदन करून विचारू लागली की हे तथागता पराभवाला पावणारा माणूस कोणता व त्या माणसाच्या पराभवाची कारणे कोणती ? त्यावर बुद्धांनी सांगितलं की बुद्धांनी सांगितले आहे की जे शिल सदाचाराचे आचरण करित नाही, दुराचारि आहेत व्यभीचारि आहेत, हिंसा करणारे आहेत, चोरी करणार, खोटे बोलणारे, व्यसनी हे दृष्ट व्यक्ती असतात, जे खोटेपणा करतात असत्यावर चालतो ते स्वतःच आपल्या जीवनाचा पराभव करतात. जे आळशी आहे, परिश्रम करीत नाही आपले कर्तव्य पार पाडत नाही ते समाजात मागे पडतात. जे दुष्टांच्या संगतीत रमतात, वाईट प्रवृत्तीचा स्वीकार करतात त्यांचे मन हळूहळू अंधकारमय होते. जे मद्यपानात, दुराचारात, लोभ आणि कामवासनेत अडकतात ते स्वतःची प्रतिष्ठा गमावतात. क्रोध, मत्सर आणि द्वेष यांच्या आहारी जाणारा मनुष्य स्वतःच्या शांतीचा, स्वतःच्या आनंदाचा नाश करतो आणि जो धम्माची निंदा करतो सत्य व सद्गुणांचा अवमान करतो आणि समर्थ असून आपल्या वृद्ध आई–वडिलांना सांभाळत नाही तो माणूस स्वतःच्या पराभवास कारणीभूत ठरतो व खऱ्या अर्थाने पतन पावतो म्हणून धम्मप्रेमी हा नेहमीच उन्नतीपथावर जातो तर धम्मद्वेषी हा कायम अधोगतीच्या मार्गावरील वाटसरू असतो व हेच त्याच्या पराभवाचे कारण आहे. असे प्रतिपादन प्रवचनकार प्रशांत मोहिते यांनी बौद्धजन पंचायत समितीच्या वर्षावास मालिकेचे बारावे पुष्प गुंफत पराभव सुत्त या विषयावर बोलत असताना केले.

बौद्धजन पंचायत समिती संलग्न संस्कार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने वर्षावास प्रवचन मालिकेचे आयोजन करण्यात आले आहे त्या प्रवचन मालिकेचे बारावे पुष्प उपकार्याध्यक्ष एच. आर. पवार यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, परेल, मुंबई – १२ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोहर बा. मोरे यांनी आपल्या धीरगंभीर पहाडी आवाजात केले तर संस्कार समितीचे अध्यक्ष मंगेश पवार यांनी पाहुण्यांची ओळख करून देत प्रस्ताविक सादर केले त्यावेळी प्रवचनकार प्रशांत मोहिते यांची सभागृहाला ओळख करून दिली तसेच २२ सप्टेंबर पासून होणाऱ्या श्रामनेर शिबिरात सहभागी होण्यासाठी २६ जणांनी नावनोंदणी केली असून अजून कोणाला सहभागी व्हायचे असल्यास त्यांनी नावनोंदणी करावी असे आवाहन केले सोबतच स्मारकाच्या निधी करता बौद्धाचार्य, बौद्धाचार्या यांनी सढळ हस्ते धम्मदान करीत आपली मदत ऑक्टोबर पर्यंत जमा करावी असे आवाहन केले. आपल्या भाषणात सभागृहाला संबोधित करत असताना सभापती आनंदराज आंबेडकरांनी प्रवचनकार प्रशांत मोहिते यांनी पराभव सुत्त या विषयावर बोलत असताना अत्यंत मुद्देसूद मांडणी करीत माणसाच्या पराभवाची कारणे यावर योग्य विवेचन करीत धम्मप्रेमी व धम्मद्वेषी यातील फरक सर्वसामान्यांनाही समजेल इतक्या साध्या व सोप्या परंतु प्रभावी भाषेत समजावून दिले त्याबद्दल त्यांचे कौतुक केले व त्यांना सन्मानित करून त्यांना पुढील वाटचालीस मंगलकामना दिल्या. सदर प्रसंगी बौद्धजन पंचायत उपसभापती विनोद मोरे, समितीचे सरचिटणीस राजेश घाडगे, कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, उपकार्याध्यक्ष मनोहर सखाराम मोरे, विठ्ठल जाधव, लवेश जाधव, राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, जी. डी. गमरे, महेंद्र कांबळे, मिलिंद जाधव, मंगेश जाधव, दर्शन कांबळे, संतोष सावरकर, संदेश गमरे, तुकाराम घाडगे, माजी चिटणीस, अंजलीताई मोहिते, प्रमिलाताई मर्चंडे, सचिव सावी, विश्वस्त मंडळ, मध्यवर्ती कार्यकारिणी, सर्व शाखांचे पदाधिकारी, सभासद, महिला मंडळ, बौद्धाचार्य, बौद्धाचार्या, विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर प्रसंगी भगवान साळवी, किशोर साळवी, सुभाष साळवी, सुधीर साळवी, स्वाती भगवान साळवी, ज्योती किशोर साळवी, प्रिया साळवी, कार्तिकी साळवी व परिवार यांच्या वतीने उपस्थित उपासक उपासिकांना धम्मदानस्वरूपात अल्पोपहार देण्यात आला. सरतेशेवटी मनोहर बा. मोरे यांनी सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे, प्रवचनकार प्रशांत मोहिते व अल्पोपहार देणाऱ्या भगवान साळवी व त्यांच्या परिवाराचे व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# आता याला काय म्हणावं ! पाक सैन्याने त्यांच्याच देशात केला एअरस्ट्राईक ; हल्ल्यात लहान मुले अन् महिलांसह ३० नागरिक ठार

पाकिस्तानी सैन्याने त्यांच्याच पश्तून नागरिकांवर हवाई हल्ले केले आहेत, ज्यामध्ये महिला आणि मुलांसह ३० नागरिकांचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पहाटे २ वाजता, पाकिस्तानी हवाई दलाने खैबर पख्तूनख्वा प्रांतातील तिरह खोऱ्यातील मात्रे दारा गावावर गऋ–१७ लढाऊ विमानांमधून किमान आठ ङ्ङ–६ बॉम्ब टाकले, ज्यामध्ये ३० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला. मात्र, पाकिस्तान सरकारने अद्याप या हल्ल्याबाबत अधिकृत निवेदन जारी केलेले नाही.

समोर आलेल्या माहितीनुसार,मृतांमध्ये बहुतेक महिला आणि मुले आहेत, तर २० हून अधिक लोक जखमी झाल्याचे वृत्त आहे. बॉम्बस्फोटामुळे गावाचा मोठा भाग उद्ध्वस्त झाला आहे आणि मृतदेह सर्वत्र विखुरलेले आहेत. स्थानिक रहिवासी आणि प्रत्यक्षदर्शींच्या मते, मोठ्या स्फोटांचे आवाज ऐकू आले तेव्हा लोक झोपेत होते. बॉम्बस्फोट इतका तीव्र होता की गावाचा मोठा भाग पूर्णपणे उद्ध्वस्त झाला. अनेक घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत, सर्वत्र फक्त ढिगारा शिल्लक आहे. गावातील रस्ते आणि रस्ते उद्ध्वस्त घरांच्या ढिगाऱ्यांनी भरलेले आहेत, ज्यामुळे बचाव आणि मदत कार्यात लक्षणीय अडथळा निर्माण झाला आहे. सोशल मीडियावर फिरणाऱ्या व्हिडिओंमध्ये गावातील विध्वंस आणि जखमींचे आक्रोश स्पष्टपणे दिसून येतात.बेपत्ता लोकांचा शोध सुरूच आहे बॉम्बस्फोटानंतर अनेक लोक ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती आहे. स्थानिक लोक स्वतःहून बचावकार्य करत आहेत आणि बेपत्ता लोकांचा शोध घेत आहेत. तथापि, मोठ्या प्रमाणात झालेल्या विध्वंसामुळे शोध आणि बचाव कार्यात मोठे आव्हान निर्माण झाले आहे. जखमींना उपचारांसाठी जवळच्या रुग्णालयात नेले जात आहे. पाकिस्तान सरकारने अद्याप त्यांच्याच देशातील हवाई हल्ला आणि क्रूर हल्ल्याबद्दल अधिकृत निवेदन जारी केलेले नसले तरी, ही घटना कथित दहशतवादविरोधी कारवायांच्या नावाखाली या प्रदेशात पाकिस्तानी सैन्याच्या क्रूरतेचे आणखी एक उदाहरण आहे.

मानवाधिकार संघटना या हल्ल्याचा तीव्र निषेध करत आहेत आणि गुन्हेगारांवर कारवाई करण्याची मागणी करत आहेत. ही घटना पाकिस्तानमधील अंतर्गत कलह देखील अधोरेखित करते.

# समता सैनिकांचे प्रशिक्षण शिबिर संपन्न.



लातूर :– बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या समता सैनिक दलाला २०२७ मध्ये शंभर वर्ष पूर्ण होत आहेत. हे औचित्य साधून महाराष्ट्रामध्ये एक लाख सैनिक निर्माण करून बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देण्याचे मनोदय भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष आद. डॉ. भीमराव साहेब आंबेडकर यांनी संकल्प व्यक्त केला आहे. त्या धर्तीवर औसा तालुका शाखेच्या वतीने सारोळा येथे २१ सप्टेंबर, २०२५ रोजी विश्वशांती बुद्ध विहार सारोळा ता. औसा जि. लातूर येथे एक दिवसीय तालुका स्तरीय समता सैनिक दलाचे प्रशिक्षण शिबिर आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत चालले यामध्ये लाठी, काठीसह इतरही प्रशिक्षण देण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य संघटक तथा लातूर जिल्हा प्रभारी आयु. प्रा. बापूसाहेब गायकवाड सर यांच्या हस्ते संपन्न झाले व असिस्टंट लेफ्टनंट जनरल आयु. राजाराम साबळे यांनी मार्गदर्शन केले, डिव्हिजन ऑफिसर विकास दंतराव, कंपनी कमांडर नानासाहेब आवाड, जिल्हा सचिव देवराव जोगदंडे यांनी प्रशिक्षण दिले. याप्रसंगी जिल्हा उपाध्यक्ष आयुनि. कविताताई कांबळे यांनी कालाम सुत्त या विषयावर धम्म प्रवचन दिले तर औसा तालुकाध्यक्ष आयु. कैलास सोनकांबळे अध्यक्षस्थानी होते. कोषाध्यक्ष मारुती कांबळे येळीकर यांनी सूत्रसंचालन केलं, तालुका सरचिटणीस दिलीप बौद्धवीर, समता सैनिक दल औसा तालुकाप्रमुख श्याम सुरवसे, सचिव रंगनाथ कांबळे, औसा महिला तालुकाध्यक्ष आयुनि. कीर्तीताई कांबळे, शाखा अध्यक्ष इस्माईलकांत लोखंडे, ८७ उपासक उपासिका युवक युवती यांनी समता सैनिक दल प्रशिक्षण शिबिरामध्ये सहभाग नोंदवला आहे. यावेळी सारोळा, भादा व औसा तालुका चे पदाधिकारी उपस्थित होते. शिबीर संपन्नतेसाठी प्रकाश लोखंडे, निखिल लोखंडे, प्रकाश कांबळे विशाल वाघमारे दयानंद गायकवाड या सर्वांनी परिश्रम घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला.

# समाजभूषण उत्तम तरकसे यांचा आसाम, मणिपूर राज्यात सन्मान



नवी मुंबई :– समाजभूषण उत्तमराव दासू तरकसे असरडोहकर (महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक व विचारवंत) हे शासकीय कामानिमित्त आसाम, मनीपुर व मिझोरम राज्याच्या बारा दिवसाच्या दौऱ्यावर असताना शासकीय कामकाजा निमित्त आसाम मधील कामरूप जिल्ह्यातील नगरबेरा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्री लोकी बोरव तसेच गोलपारा जिल्ह्यातील लखीपुर पोलीस ठाणे प्रभारी मॅडम प्रतिभा चौधरी तसेच मणिपूर राज्यातील जिरीबाम व फेरजौल जिल्ह्यातील जिरेबेन पोलीस ठाणे मधील प्रभारी मिरेला अहमद व मिझोरम राज्यातील कोलंबीस जिल्ह्यातील कोलंबीस पोलीस ठाणे येथील शासकीय कामकाजाकरिता मा श्री उत्तम तरकसे हे गेले असता सदर प्रभारी अधिकारी यांनी त्यांना मानाची आसामी जॉपी टोपी घालून स्वागत व सन्मान केला. सदर राज्यातील महत्त्वाच्या अतिथींचे स्वागत व सन्मान हीच जॉपी टोपी घालून त्यांचा आदर सन्मान केला जातो तीच मानाची असामी जॉपी टोपी घालून समाजभूषण मा श्री तरकसे यांचे आदरपूर्वक सन्मान व स्वागत करण्यात आले, सदर पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांचे तरकसे यांनी मनापासून खूप खूप आभार मानले तसेच सदर शासकीय कामकाजाकरिता माझी निवड वरिष्ठ प्रभारी अधिकारी श्री अजय कांबळे, दुय्यम प्रभारी अधिकारी श्री सुरज पाटील, तृतीय प्रभारी अधिकारी मॅडम शीतल पाटील, तसेच टीमचे इन्चार्ज प्रदीप आव्हाड व सुरज जाधव यांचे सुद्धा आभार व्यक्त केले

सदर दौऱ्या दरम्यान मा तरकसे यांनी परिसरातील सामाजिक सांस्कृतिक परिवर्तन व शेती परिसराचा अभ्यास व आंबेडकरी चळवळीचे अवलोकन करण्यावर सुद्धा त्यांनी भर दिला.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी अशक्य गोष्टी शक्य करतात; उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन असं का म्हणाले?

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात अशक्य गोष्टी शक्य करण्याची क्षमता आहे, असे कौतुक उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासह जगातील अनेक नेत्यांशी मोदी यांचे मैत्रीपूर्ण संबंध असल्याचे त्यांनी नमूद केले.मोदींचे मैत्रीपूर्ण संबंध – पंतप्रधानांच्या भाषणांवरील दोन पुस्तकांच्या प्रकाशन समारंभात उपराष्ट्रपती राधाकृष्णन बोलत होते. ते म्हणाले, अमेरिकेने भारतावर ५० टक्के शुल्क लादले असतानाही डोनाल्ड ट्रम्प यांनी नेहमीच पंतप्रधान मोदी यांना आपला चांगला मित्र म्हटले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात मतभेद असतानाही चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासोबतही मोदी यांचे चांगले संबंध आहेत. उपराष्ट्रपतींचे पहिले सार्वजनिक भाषण – उपराष्ट्रपतीपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर पहिल्याच सार्वजनिक कार्यक्रमात राधाकृष्णन म्हणाले, अमेरिकेने भारतावर ५० टक्के शुल्क लादले, तरी ट्रम्प नेहमी म्हणतात की मोदी माझे चांगले मित्र आहेत.

# आदर्श महापुरुषांच्या विचारांची मशागत केली तर आदर्श समाज तयार होईल. _ बी. बी. मेश्राम १३३ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.



छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन, नालंदा बुद्ध विहार समिती व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने, नालंदा बुद्ध विहार, संघर्ष नगर, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे आपल्या धार्मिक, सामाजिक व राजकीय आयुष्याचा पाया बुद्धिवाद हाच असला पाहिजे. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ८१ व्या वर्धापन दिनानिमित्त सदरील प्रासंगिक विषयावर १३३ वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा २१ सप्टेंबर २०२५ ला संपन्न झाली. फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, धार्मिक क्षेत्रात प्रगती करायची असेल तर धम्माचे आचरण केले पाहिजे. बुद्धिस्ट रिलिजियस सेमिनरी प्रमाणे चर्चा करून सामान्य जनतेला मानवतावादाकडे वळविले पाहिजे. सामाजिक दृष्ट्या विचार करता देशात भारताचे संविधानानुसार समाज तयार करण्यासाठी सर्व नागरिकांना भारताचे संविधान समजावून सांगण्यासाठी जनजागृती अभियान राबविले पाहिजे. परिणामी सारा भारत बौद्धमय करण्याचे स्वप्न साकार करता येईल. तसेच राजकीय दृष्ट्या विचार करता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अपेक्षेप्रमाणे शासनकर्ती जमात व्हायचे असेल तर जनतेचे जनमत तयार करण्यासाठी ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रन्स टू पॉलिटिक्स चालविले पाहिजे जेणेकरून प्रशिक्षित कार्यकर्त्यांची फळी निर्माण होईल. ज्यांच्यामार्फत समाज जीवनात विचारधारेचा प्रचार व प्रसार केला जाऊ शकेल. करिता या आठवड्यात बौद्धाचार्याचे जनक भैय्यासाहेब यशवंतराव आंबेडकर व राष्ट्रसंत नारायण गुरु यांच्या स्मृतिदिनानिमित्त आणि कॉम्रेड शरद पाटील व पेरियार ई. व्ही. रामासामी नायकर यांच्या जयंतीनिमित्त आदर्श महापुरुषांच्या विचारांची मशागत केली पाहिजे. म्हणजे आदर्श समाज तयार होईल. परिणामी परिवर्तनवादी आंदोलनाला वेगाने गतिमान करता येईल.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना सविता अभ्यंकर म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलासाठी मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता, हे महिलांनी लक्ष्यात घेतले पाहिजे. राजकीय दृष्ट्या विचार करतात निवडणूक प्रक्रियेत आपण कुठे आहोत? धार्मिक दृष्ट्या विचार करता फार कमी विहारे सक्रिय आहेत. त्यात तरुणांचा सहभाग नसल्यासारखा असतो. याप्रसंगी विश्राम राऊत म्हणाले की, बुद्ध फुले शाहू आंबेडकरांचे विचार हे त्रिकालबाधित सत्य आहे. ते स्वीकारण्यासाठी बुद्धीवाद वापरला नाही तर आपण लयास जाणार आहोत.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला व पुष्प अर्पण करण्यात आले तर नालंदा बुद्ध विहाराच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. भंते कुलिनपुत्र वेस्सभुज्ञी थेरो यांनी कार्यशाळेचे उद्घाटन केले. सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके व प्रास्ताविक दिलीप गझहंस यांनी केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, ॲड. विलास रामटेके, , उद्योजक शशिकांत काळे, विश्वनाथ इंगळे, गौतम धनेधर, इंजि. किशोर पाटील, रामदास अभ्यंकर, गंगाराम बोर्डे, प्रकाश सदाफुले, शेषराव हनुमंते, विश्राम राऊत, डी. एल. मोकळे, किसन मोरे, द्वारका गजहंस, मालती दंदे, लताबाई बोर्डे, मायाबाई राऊत, कलावती भालेराव, इंदुबाई बागुल, भाग्रताबाई गायकवाड, कमल हनुमंते, छाया मोकळे, सुमन नहिवळे, विश्वनाथ जाधव, रामराव सूर्यतळे, एम. बी. साळवे, किसन गणराज, अण्णाराव जाधव, दिलीप गजहंस, ज्ञानेश्वर खंदारे इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE